**CURRENT GLOBAL REVIEWER**
Special Issue | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue I Vol. II , 10th March 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# जागतिकीकरण, कल्याणकारी राजकारण आणि दुर्बल घटक

**डॉ.शिवाजी सोमला पवार**
एम.ए.,पीएच.डी. , संशोधन-मार्गदर्शक,इतिहास विभाग, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,भोकर ता.भोकर जि.नांदेड

------------- (73) -------------

**प्रस्तावना :-**

आर्थिक व्यवहारांचे शिथिलीकरण आणि जागतिकीकरण हे १९८० च्या दशकानंतरचे परवलीचे शब्द झाले आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी त्यांचा प्रसार केला. सात धनवान राष्ट्रगटाच्या (जी-७) प्रभावाखालील आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व जागतिक बँकेने कर्ज देतांना ऋणकोंनी तो आंमलात आणावा अशा अटी घातल्या. जागतिकीकरणास एकीकडे उत्पादकांचा,व्यापाऱ्यांचा पार्ठीबा आहे तर दुसरीकडे कामगारांचा त्याला विरोध सुरु झाला आहे. त्यांनी आपल्या आडमुठया, सगळया जनतेला वेठीस धरणाऱ्या बंद आणि संप यांनी जनतेचा रोब ओठवून घेतला आहे. व जनतेचा त्यांना पाठिंबा नाही.

जागतिकीकरणाचे उदगाते जागतिकीकरणाची ही लाट नवी नाही असे सांगतात. आंतरराष्ट्रीय व्यापार व विदेशी गुंतवणूक ही जागतिकीकरणाची दोन क्षेत्रे घेतली तर सुवर्ण परिमाणाच्या काळात म्हणजे अंदाजे १८९० ते १९१३ या पहिल्या महायुद्धापूर्वीच्या काळात व्यापार- धंद्याच्या वाढीतून जार्गतिकीकरण होत राहिलेले होतेच. अमेरिकी, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया अशा नव्या प्रदेशातून गोरे लोक जाऊन राहिले होते व त्यांनी औद्योगीकरण हाती घेतले हाते.१९१३ च्या सुमारास १६ सर्वाधिक औद्योगिकरण झालेली राष्ट्रे आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या २१ टक्क्याइतकी निर्यात करीत होती.१९९२ मध्ये ओ.ई.सी.डी तील देशाची निर्यात १७ टक्के होती. १९७३ पासून विदेशी चलन विनिमय दर नम्य (प्लेक्झीबल)राखायला सुरुवात झाली जागतिकीकरणामुळे जागतिक उत्पादन आणि निर्यात मोठया प्रमाणाने वाढली आहे. १९८० च्या मानाने १९९९ त ही वाढ अनुक्रमे १७७ व २२७ टक्के होती . या उलट जागतिकीकरणामुळे बेकारीचे प्रमाण कमी झाल्याचे दिसत नाही.

जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, ·रोजगार, तंत्रज्ञान,दळणवळण, विदेशी स्थालांतर, पर्यावरण, राहणी, शासन ,समाजव्यवस्था,संस्कृती अशा सर्व क्षेत्रातून होत राहणारे रुपांतर होय असे म्हणता येईल. या संज्ञेत वित्त व भांडवल यांची मालकी, संशोधन व ज्ञान यांना संलग्र तंत्रज्ञान, बाजार व स्पर्धा, नवनव्या वस्तुद्वारा उपभोगाचे सारखेपण व राहणीमानाचे आधुनिकीकरण, पाश्चिमात्य कलांचा प्रभाव व सांस्कृतिकीकरण, एकंदर विश्वातील जाणीव, राजकीय संलग्रता, जागतिकीरकण अशा रितीने आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रे व्यापीत आहे. १७ व्या शतकात झालेल्या वैज्ञानिक क्रांतीनंतर नैसर्गिक शास्त्रांप्रमाणेच अर्थशास्त्र, इतिहास, यासारख्या मानव्यविद्यांतील संशोधनासाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला.

**कल्याणकारी राजकारण :-**

१९७० च्या दशकापासून जागतिकीकरणाला म्हणजे शिथिलीकरणाला गतीने सुरुवात झाली. बहुराष्ट्रीय कंपन्या आणि अमेरिका यांच्या पुढाकाराने तसेच अमेरिकेच्या नेतृत्वाखाली आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांच्या कर्जसाहाय्य देतांना लादावयाच्या अटीतून शिथिलीकरणाची कार्यवाही रेटली जात आहे, सोविएन रशियाचे विभाजन झाल्यापासून पूर्व युरोपमधील देशांनी व खुद्द रशियानेही या तत्वाचा स्वीकार केला आहे. १९७० पूर्वीसमाजवादी/साम्यवादी तत्वज्ञान झटकले गेले . उत्पादक निर्माणक उद्योग उभे करणे, चालविणे हे सरकारचे क्षेत्र नसून, शिक्षण आरोग्य व मानवविकास ही त्याची क्षेत्रे आहेत हा विचार बनवला. एकूण राष्ट्रीय विनियोगातील सरकारी विनियोगाचे प्रमाण कमी झालेले नाही. कारण यातून नकारात्मक अधिकाराची, स्वत:ची सत्ता चालविणारी, लाचखोर नोकरशाही वाढली. तसेच खाजगी क्षेत्रास संपत्ती, रोजगार, विज्ञान, तंत्रज्ञान यातून विशेष गुंतवणूक करावी.

समाजवादातून सामाजिक उन्नती हे तत्वज्ञान ब्रिटन व रशिया यातील गेल्या-५०-६० वर्षाच्या अनुभवातून निष्फळ ठरले आहे. परंतु जागतिकीकरणाच्या विचाराचा स्वीकार करतांना होणाऱ्या मानवांचा सर्वागिक विकास, जगातले दारिद्रय, उपासमार, कष्ट करुन पोट भरण्यास वाव मिळतो. जागतिकीकरणातून सर्व जगाची आर्थिक उन्नती हे नव्या युगाचे उद्दिष्ट आहे. प्रगत देशातील आर्थिक अभिवृद्धी,

विकसनशील देशांचा आर्थिक विकास कसा होतो याबद्दलच्या उद्दिष्ट वेगळे आहे. दक्षिण कोरिया, तायवान, सिंगापूर, हाँगकाँग हे नव औद्योगिक देश भरभराटीस आले. विकासनशील देशात १९९३ उभ्या असलेल्या ५० सर्वात मोठया बहुराष्ट्रीय कंपन्यापैकी २६ मोठया बहुराष्ट्रीय कंपन्या या चार देशात कार्यरत होत्या. इलेक्ट्रॉनिक्स, मोटारगाडया, बांधकाम, रासायनिक उद्योग, तेलशुद्धीकरण, सिमेंट, वीजनिर्मिती, हॉटेल, व्यापार, तंत्रज्ञान आणि भांडवल या चार देशातील विदेशी भांडवलाचा साठा १९८५ मध्ये १२२६ कोटी डॉलर्सवरुन १९९३ मध्ये ७२७४ कोटी डॉलर्स एवढा वाढला होता. म्हणून मानव जातीचा आर्थिक विकास ही एक वैचारिक झेप आहे. १९७४ मध्ये ७७ देशांच्या गटाने राष्ट्र संघास बहुराष्ट्रीय कंपन्यासाठी युनोचा आयोग नेमण्यास भाग पाडले. १९७० नंतर अमेरिकेने विदेशी चलन-विनिमय दर स्थिर राखणारे १९४८ पासून ब्रेटन बुडस संघटनांनी (जागतिकबँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी) यांनी स्वीकारलेले धोरण सोडून दिले. प्रभावी मागणी वाढविण्याचा प्रयत्नात देशांतर्गत कर्जाचा बोजा, राजकोषीय तूट वाढते, भाववाढ, कर्जेकमी करावीत हा विचार बनवला. अर्थव्यवस्थेतून सरकारीक्षेत्र कमी व्हावे, खाजगी क्षेत्र वाढावे म्हणजे खाजगी क्षेत्राची प्रेरणा वाढते या विचारसरणीवर ही संकल्पना आधारलेली आहे. १९८१ साली भारत कर्जासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे गेला. कारण भारत पुनः१९९१ मध्ये आर्थिक कोंडीत सापडले. यावेळी सरकारची विश्वासार्हता डळमळलेली होती. प्रथम नाणेनिधीकडे भारत १९८१ साली गेला. पण १९९१ मध्ये आर्थिक कोंडी झाल्याने या सुधारणांना गती मिळाली. बहुराष्ट्रीय प्रत्यक्ष गुंतवणुकीपेक्षा वित्तीय गुंतवणूक कितीतरी पटीने अधिक आहे.शेअर बाजारातील प्रचंड चढडतारातून दृग्गोचार होत आहे. त्यावर प्रभावी नियंत्रण आवश्यक आहे परिस्थितीनुसार आयातीवर नियंत्रण व स्वातंत्र्य राखायला हवे, भांडवलावर नियंत्रण, वित्तीय उलाठालींवर करप्रमणाली, बहुराष्ट्रीय कंपन्यावर व्यवहारसंहिता, जागतिक व्यापारोद्योग व व्यवहारावर नियमन, जागतिक आर्थिक व्यवहारामागे कोणचेही हितसंबंधी नसावे.

**जागतिक व्यापार आणि जागतिक व्यापारी संघटना :-**

१९८६ च्या अखेरीस बहुराष्ट्रीय व्यापारी वाटाघाटीसाठी गॅट अंतर्गत व्यापारासंबंधीच्या नियमाचा मसुदा तयार करण्यास सुरुवात झ ाली. युरुग्वे फेरी यातून वाटाघाटीतून गॅट १९९४ चा कारार निष्पन्न झाला. १ जानेवारी १९९५ पासून जागतिक व्यापारी संघटना (जा.व्या.सं.WTO) उभी राहिली आहे १) खुला व्यापार का उद्योगांना संरक्षण २) खुला व्यापार का उचित व्यापार ३) अमेरिकेचे कलम ३०१, ४) गटवार व्यापारी समझोते ५) जागतिक व्यापारी संघटना १९९५, ६) कृषी उत्पादनाचा व्यापार ७) जा.व्या.सं.धी तक्रार निवारण यंत्रणा , भारताच्या आणि विकसनशील देशांच्या कृषीमालाच्या निर्यतीवर प्रगत देशाकडून, गॅट १९९४ च्या विषम समझोत्यामुळे, येणारे अडथळे वाढविण्याचा नेटाने प्रयत्न करणे कृषी उत्पादन जास्त झाले की, ठराविक किमतीस सखारने खरेदी केलेच पाहिजे हीजी सरकारवर अवलंबून राहण्याची कृत्ती निर्माण झाली आहे. ती मनोवृत्ती मुळात बदलणे अपरिहार्य आहे.

**श्रमाबद्दलचे आंतरराष्ट्रीय श्रमसंघटनेचे मानव कोणते : -**

कामगारांच्या अधिकारांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

१) मुलभूत अधिकार - बालकामगाराचा वापर, गुलाम म्हणून वापर, वेठबिगारी, शारीरिक जबरदस्ती यास विरोध .

२) जगण्याचा अधिकार :- जीविकावेतन, अपघातात नुकसान भरपाई व दिवसातून काही तास काम करण्यावर मर्यादा, आठवडयाची पगारी सुटी .

३) सुरक्षा अधिकार :- केव्हाही स्वेच्छेनुसार काढून टाकण्यावर बंदी, निवृत्तीभरपाई, कामाच्या ठिकाणी मृत्यू आल्यास कुटुंबियांना नुकसान भरपाई .

४) नागरी अधिकार :- संघटना करण्याचा, सामूहिक सौदा करण्याचा, अडचणी आणि तक्रारी मांडण्याचा व त्या निवारुन घेण्याचा अधिकार

१९१९तील स्थापने पासून आजवर १७४ प्रकारचे करार व ठरावाचे समझोते झाले. विविध देशांनी अनुसमर्थन दिलेल्या

समझोत्यांची संख्या फ्रॉन्स - ११४, ब्रिटन -८०, जर्मनी ७३, क्युबा-८६, इराक -६४, भारत -३६, अमेरिका केवळ ११ हे रात्रपाळी, रासायनिक, बांधकाम, आरोग्य, संरक्षण, पत्रव्यवहार, व्यावसायिक आरोग्य सेवा, कामावरुन काढणे, व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य या संबंधातल्या समझोत्यांना अमेरिकेकडून अद्याप अनुसमर्थन मिळावयाचे आहे श्रमाबदलच्या मानकाच्या अंमलबजावणीचा विचार करतांना लोकशाही स्वीकारलेल्या देशांचा विचार करावा लागतो .कुटुंबातील वाढत्या उत्पन्नांमुळे स्त्रिया आणि बाळांनी कामावर जाण्याची गरज कमी झाली असल्याचे दिसून येते. १९८७-८८साली बालकामगारांची संख्या १ कोटी ४७ लाख होती. १९९९-२००० त ती ७९ लाखावर आली.

**जागतिक व्यापारी संघटनेसंबंधी भारताचा दृष्टीकोण :-**

जागतिक व्यापारी संघटनेचे मंत्र्यांचे तिसरे अधिवेशन अमेरिकेतील सियाटल येथे ३० नोंव्हेंबर ते ३ डिसेंबर १९९९ मध्ये भरले होते. कृषी, श्रम, पर्यावरण इ. विषयासंबंधात तीव्र मतभेद आढळले : अशा या अपेक्षीत बैठकीत भारताने कोणती भूमिका घ्यावी याबद्दल सूचना देण्यासाठी पंतप्रधानांनी डिसेंबर १९९९ मध्ये आठ विशेष समित्या नेमल्याचे जाहीर केले.

१) जा.व्या.सं.साठी भारताने आपले हित रक्षण करणारे कोणते डावपेच ठरवावेत !
२) जागतिकीकरणातील घसरटी कशा चुकवाण्यात !
३) खाजगी क्षेत्रातील चोख व्यवस्थापन .
४) शिक्षण, आरोग्य व ग्रामीण विकासासाठी धोरणाचा ढाचा .
५) गुंतवणूक ऱ्हास कशा रितीने करावी ?
६) पारंपारिक उद्योगांचे पुनरुज्जीवन
७) उर्जा-क्षेत्रातील सुधारणा
८) परदेशातील भारतीय बुद्धी आणि संपत्ती विकासासाठी कशी वळवावी .

व्यापार, प्रवास, बँका, हॉटेल्स इ.हे सेवाच्या व्यापारात मोडतात. यासाठी माणसांची गरज असते. तेंव्हा माणसांना खुलेपणाने स्थलांतर करायला मुभा मिळावला हवी. विदेशी व्यापारात भारताला विदेशी उद्योगाशी टक्कर द्यावी लागते. याची सात कारणे उघडकीस आली आहेत .

१) उद्योगधंदा उभा करण्यासाठी लागणाऱ्या परवान्यासाठी बरीच पायपीट करावी लागते व त्यात दिरंगाई होते.
२) उद्योगाचा आकार वाढविण्यावर बंधने आहेत.
३) वीज,व्याजाचे दर, विदेशाशी तुलना करता चढ आहेत.
४) रस्ते, पाणी, वाहतूक, दळणवळण सुलभतेने मिळत नाही.
५) नको होणाऱ्या, त्रास देणाऱ्या कामगारांना चटकन काढता येत नाही.
६) विक्री करा ऐवजी मूल्यवर्धित कर यावयास हवा.
७) कमी कायदे पण चोख अमलबजावणी हवी, विनियामक यंत्रणा चोख हवी

भारतात निर्माण झालेली वस्तू असा भारत ब्रँड निर्माण व्हावा असा सर्वांनीच प्रयत्न करायला हवा. स्वतंत्र भारताचे विदेश प्रत्यक्ष गुंतवणूकी संबंधीचे धोरण प्रथम १९४८ साली जाहीर झाले १९६८ पासून कोणत्या उत्पादनात विदेशी भांडवल गुंतविता येईल हे निर्दिष्ट केले गेले. १९७३ पासून मक्तेदारीविरोधी कायदे विदेशी कंपन्यांनाही लागू करण्यात आले.

१९९१ च्या ऑद्योगिक धोरणाने बरीच शिथिलता आणलेली आहे व विदेशी गुंतवणूकीस मोकळीस मिळालेली आहे.

**समाजातील दुर्बल घटकांचा सामाजिक व आर्थिक विकास :-** मानवी संसाधन विकासातील पायाभूत व प्राथमिक घटक म्हणजे बालकल्याण, महिला विकास, युवा कल्याण, अनुसूचित जातीचे कल्याण, इतर मागासांचे (ओबीसी) कल्याण, अल्पसंख्यांक विकास, अपंगकल्याण, वृद्धाचे कल्याण, कामगार कल्याण, ग्रामीण विकास, कारण या टप्यातच जीवनाचा पाया घातला जातो .

त्यामुळेच जगभर मानवी जीवनातील पहिली सहा वर्षे अत्यंत महत्वाची मानली जातात. या वयातच व्यक्तीच्या भावनिक, मानसिक, सामाजिक, शारीरिक विकासाची पायभरणी होते. बालविवाह प्रतिबंध कायदा, १९२९, बाल कामगार कायदा , १९८६ , गर्भजल परीक्षण प्रतिबंध कायदा, १९९४,बाल न्याय कायदा, २०००, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम, २००२, बाल हक्क संरक्षण आयोग कायदा, २००५ तसेच कोणत्याही समाजाचा विकास महिला कल्याणवर आधारभूत असतो. हे लक्षात घेऊन शासनाने महिला कल्याणासाठी विविध कायदे, योजना व कार्यक्रम तयार करुन त्याची अमलबजावणी केली आहे. कौटुंबिक छळ, शोषण, सामाजिक समस्या सोडविण्यासाठी १९६९ मध्ये मुली व महिलासाठी निवाऱ्याची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते.

भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ४० टक्के प्रमाण युवकांचे आहे. हीच देशाची खरी शक्ती असल्यामुळे त्यांच्या विकासात विविध धोरण अवलंबले जातात, हीच युवा शक्ती देशाचा विकासात महत्वपूर्ण योगदान देऊ शकते या उद्देशाने युवक कल्याण आणि क्रिडा मंत्रालय विविध योजना आखत असते. शासनाच्या योजना, युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी दिले जाणारे पुरस्कार आणि क्रिडाविषयक धोरणे युवा कल्याणासाठी महत्वाची आहेत. भारताने लोकशाही शासनाचा स्वीकार करुन राजकीय न्यायाबरोबरच आर्थिक-सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट निर्धारित केले. भारतासारख्या जात, वर्ग व लिंगाधारित विषमता असणाऱ्या समाजात केवळ नागरी, राजकीय समतेची हमी देणे अपुरे ठरले असते म्हणून घटनाकारांनी विविध घटनात्मक तरतुदी, विकास धोरणे, योजना व कार्यक्रमाद्वारे दुर्बल घटकांचा विकास धोरणे, योजना व कार्यक्रमाद्वारे दुर्बल घटकांचा विकास हाती घेतला. भारतीय राज्यघटनेत एका भागात आदिवासी जमातीची सूची तयार करण्यात आली. त्यांना शासकीय पातळीवर आदिवासी जमाती हा दर्जा प्राप्त होतो. १९७६ सालच्या The Scheduled Castes and Scheduled Tribes Orders (Amendment) या कायद्यान्वये आणि राज्यांनी केलेल्या कायद्याद्वारे ५५० पेक्षा जास्त आदिवासी जमातीचा समावेश शासकीय या मध्ये केला आहे.

मागासवर्गीयांकरिता आरक्षण स्वातंत्र्यपूर्ण काळात काही प्रेसिडेन्सी भागात व काही संस्थानांमध्ये लागू होती. छ. शाहू महाराजांनी आपल्याक ोल्हापूर संस्थानात मध्ये १९०२ पासून मागासवर्गीय समाजातील गरिबी दूर करण्यासाठी व त्यांना प्रशासनातील न्याय वाटा मिळवून देण्यासाठी ५० टक्के आरक्षण देणस सुरुवात केली. ब्रिटिश वसाहतवादी कालखंडामध्ये अशी यादी करण्याचे काम १८०६ पासून सुरु केले. १८८१ ते १९३१ मध्ये याला गती प्राप्त झाली. मागासवर्गीय चळवळीनी प्रथम दक्षिण भारतात विशेषतः तामिळनाडूमध्ये जोर पकडला देशामधील समाजसुधारकांनी केलेल्या अथक प्रयानामुळे महत्व प्राप्त आहे. समाजातील परीद्यावरी घटकांच्या कल्याणासाठी राष्ट्रीय अपंग धोरण,२००५ मध्ये आखण्यात आले. अपंगत्व प्रतिबंध आणि अपंगाचे शारीरिक व आर्थिक पुनर्वसन करणे हे या धोरणाचे मुख्य लक्ष्य आहे. शासन इतर संस्थाच्या सहकार्याच्या माध्यमातून धोरणाची अमल बजावणी करत असते. वृद्धांसाठीचे राष्ट्रीय धोरण जानेवारी १९९९ मध्ये या धोरणाची घोषणा करण्यात आली. वृद्ध व्यक्तींना संरक्षण, आरोग्य, सेवा , स्वातंत्र्य नागरिक म्हणून विकसित करण्यासाठी त्यांच्या जागृती निर्माण करणे हे होय .

जगाच्या आधुनिक इतिहासात औद्योगिक क्रांतीला चालणा देणारे हात ज्या कामगारांचे होते, त्या कामगारालाच औद्योगिक क्रांतीने जन्माला घातलेल्या भांडवलशाहीने बळी बनवले. मार्क्सने आपल्या साम्यवादी जाहिरनाम्यामध्ये याच कामागाराला जग जिंकण्याचे आवाहन केले. जगामधील पहिल कष्टकरी व वंचितांच्या राज्याचे स्वप्न रशियामध्ये साम्यवादाद्वारे साकारण्यात कामगाराला यश मिळाले. रशियामध्ये झालेली साम्यवादी क्रांती व जगभरामध्ये आपल्या न्याय हक्कांसाठी चालू असलेल्या संघर्ष या पार्श्वभूमीवर १९१९ मध्ये आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची स्थापना करण्यात आली. भारत या संघटनेचा संस्थापक सदस्य आहे. कामगार कल्याणासाठी घटनात्मक तरतुदी समतेचा अधिकार, (कलम १४ ते १८), व्यवसाय स्वातंत्र्य(कलम १९) शोषणा विरुद्धचा अधिकार (कलम २३), न्याय समाज व्यवस्था (कलम ३८), पर्याप्त जीवन साधनाचा अधिकार (कलम ३९-अ), समान कामासाठी समान वेतन (कलम ३९-ड), आरोग्याला हानीकारक नसेल असा रोजगार मिळणे(कलम ३९-ई), मार्गदर्शक तत्वातील कलम ३८ व ३९ अन्वये दिलेले अधिकार, कामाचा अधिकार (कलम ४१), वाजवी

वेतनाचा अधिकार (कलम ४३), व्यवस्थापनातील सहभागाचा अधिकार (कलम ४४-अ) कामगारांना त्यांच्या कामाचा मोबदला योग्य व खात्रीशीररित्या मिळवा.

**संदर्भ सूची :**


१. सी.पं. खेर, जागतिकीकरण समस्या, आशय आणि अनुभव , दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे २००८.

२. मधुसूदन दत्तात्रय साठे, जागतिक अर्थव्यवस्था, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २००७.

३. तुकाराम जाधव (संपादक ), महाराष्ट्राच्या ऐतिहासिक-सांस्कृतिक, राजकीय -प्रशासकीय व आर्थिक जीवनाच्या समग्र आठावा, द युनिक ॲकॅडमी, पुणे २०१२.

४. प्रा.मधुसूदन साठे, जागतिक अर्थकारण - आशियातील अर्थव्यवस्था, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २००८.

५. प्रा.मदन मार्डीकर, अधुनिक जगाचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद , जून १९९९.

६. प्रा. जास्वंदी बांबूरकर (संपादक), इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २०१४.

७. डॉ.शांता कोठेकर , इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर २००५.

८. डॉ.दा.थो.काचोळे, लोकसंख्याशास्त्र, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद २००१.